क्र.मोडीना-२०२५/प्र.क्र.१२५/१५१८/चौदा
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
दिनांक :- २८/११/२०२५.

# परिपत्रक

मानधन तत्त्वावर "मोडी मजकुराचे इंग्रजी व मराठीमध्ये लिप्यंतर/अनुवाद" करुन देणाऱ्या अनुवादकांची नामिका स्थापन करण्याबाबत.

प्रशासकीय, कायदेविषयक, वैद्यकीय, महसूल, शैक्षणिक, अभियांत्रिकी अशा विविध विषयातील "मोडी मजकुराचा इंग्रजी व मराठीमध्ये लिप्यंतर/अनुवाद" करु शकणाऱ्या तज्ञ अनुवादकांची नामिका तयार करण्यासाठी या कार्यालयाने दिनांक १५.११.२०२५ या मुदतीपर्यंत अर्ज मागविले होते. त्यास अनुसरून एकूण ५७ अर्ज सादर करणाऱ्या तज्ञ अनुवादकांचे अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेले असून त्याची यादी सोबत जोडण्यात आली आहे.

तरी, सोबत जोडलेल्या यादीचे अवलोकन करून यादीत दिलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करावी. तसेच काही त्रुटी आढळल्यास व काही सूचना असल्यास, त्या, दिनांक ०१.१२.२०२५ रोजी (संध्या ६.००) पर्यंत या कार्यालयास या कार्यालयाच्या bhashasanchalak@yahoo.in या ई-मेल वर कळवाव्यात.

कळावे, ही विनंती.

भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

सोबत :- मोडी मजकुराचा इंग्रजी व मराठीमध्ये अनुवाद करण्याकरिता प्राप्त झालेल्या उमेदवारांची यादी.